# कृषि आयुक्तालय

## मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, म. रा. पुणे-४११ ००१.

## परिपत्रक

**विषयः- पाणलोट क्षेत्र आधारित जलसंधारण कार्यक्रमांतर्गत खोल सलग समपातळी चर (Deep C.C.T.) ची कामे हाती घेणेबाबत.**

राज्यात पाणलोट विकासाच्या विविध योजनेमध्ये मृद व जलसंधारणाचे विविध उपचार राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये शेतीस अयोग्य असलेल्या पडीक जमिनीवर सलग समपातळी चर हा उपचार राबविण्यात येतो. यामध्ये ० ते ३३ टक्के उताराच्या जमिनीवर समपातळीत ६० सें.मी. रुंद व ३० सें.मी. खोल तसेच ६० सें.मी. रुंद व ४५ सें.मी. खोल या आकाराचे सलग समपातळी चर खोदण्यात येतात. अशा सलग समपातळी चरांची खोली कमी असल्याने ते गाळाने लवकर बुजतात व पर्यायाने त्यामध्ये आवश्यक जलसंधारण होत नाही. त्यामुळे ० ते ८ टक्के उताराच्या पडीक जमिनीवर १ मी. रुंद व १ मी. खोल आकाराचे खोल सलग समपातळी चर खोदल्यास डोंगर उतारावरुन वाहून जाणारे पाणी चरामध्ये साठून चांगल्याप्रकारे मृद व जलसंधारण होते, असे दिसून आले आहे. सदर बाब विचारात घेवून शासन निर्णय क्र. जलसं-२०१०/प्र.क्र.१८/जल-७, दि. २३/४/२०१० अन्वये आदर्शगांव योजनेमध्ये निवडलेल्या गावामध्ये खोल सलग समपातळी चराचे काम प्रायोगिक तत्वावर घेण्यास मान्यता देण्यात आली होती. खोल सलग समपातळी चरामुळे खालील फायदे होत असल्याचे दिसून आले आहे.

१. जमिनीवरील सुपीक मातीचा थर त्याच ठिकाणी अडवून ठेवणे व पाणी जमिनीत मुरविणे.
२. जमिनीची धूप होण्यास प्रतिबंध होतो. तसेच पाझर तलाव, नाला बांध इ. मध्यें गाळ साचण्यास प्रतिबंध होतो.
३. धरणामध्ये व बंधा-यांमध्ये स्वच्छ पाण्याचा पुरवठा होतो.
४. डोंगरामध्ये पाणी मुरल्यामुळे भूगर्भामध्ये पाणी जास्त काळ टिकून राहते. त्यामुळे झाडोरा वाढीस मदत होते.
५. क्षेत्राचे आगीपासून संरक्षण होते.
६. रखवालदाराचा खर्च वाचतो.
७. जनावरांच्या उपद्रवापासून संरक्षण होते.
८. वृक्ष संवर्धन व गवत वाढ होण्यास मदत होते.

खोल सलग समपातळी चराचे वरील फायदे विचारात घेवून शासन निर्णय क्र.जलसं/२०१२/प्र.क्र.२३/जल-७, दि. ५ मार्च, २०१३ नुसार खोल सलग समपातळी चर (Deep C.C.T.) हा उपचार पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत राज्यभर राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. खोल सलग समपातळी चराची कामे करताना खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**उद्देश :-**

१. डोंगर माथ्यावरुन वेगाने वाहत येणा-या पावसाच्या पाण्याची गती कमी करणे.
२. जमिनीची धूप कमी करणे.
३. वाहत येणारे पाणी चरामुळे तसेच गवत व झाडो-यामुळे अडून राहून जमिनीमध्ये जास्तीत जास्त मुरविणे.

४) पडीक जमिन उत्पादनक्षम बनवून काही प्रमाणांत क्षेत्र वहितीखाली आणणे.

५) उपचार योग्य पडीक व अवनत जमिनीचा विकास प्रभावीपणे व वेगाने करणे.

**क्षेत्राची निवड : -** क्षेत्राची निवड खालील निकषाप्रमाणे करण्यांत यावी.

१) पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या गावातील पाणलोट क्षेत्रामध्येच हा कार्यक्रम राबवावा.

२) जमिनीचा उतार जास्तीत जास्त ८ टक्क्यांपर्यन्त असावा.

३) जे शेतकरी सदरचा कार्यक्रम घेण्यास उत्सुक असतील, अशा लाभार्थ्यांच्या क्षेत्रातच हा कार्यक्रम राबविण्यांत यावा. नियमानुसार संबंधित शेतक-यांची लेखी संमती घ्यावी.

४) लाभार्थीचे मालकीच्या क्षेत्रावर योजना राबवावयाची असल्याने लाभार्थींनी सहकार्य करणे आवश्यक आहे.

५) चरा लगतच्या बांधावर निर्माण होणा-या झाडाझुडपांचे संरक्षण करणारा लाभार्थी असावा.

**चरांची आखणी करणे :-**

१) सर्वप्रथम पाणलोट क्षेत्रात नमूद केल्याप्रमाणे वहिती अयोग्य क्षेत्राचे ३० x ३० मी. अंतरावर सर्व्हेक्षण करुन तयार केलेले समपातळी नकाशे प्राप्त करुन घ्यावेत.

२) सदर क्षेत्राचे ३० x ३० मी. अंतरावर दुर्बिणच्या सहाय्याने समपातळीदर्शक नकाशा तयार करावा. जमिनीचा उतार ८ टक्केपेक्षा कमी असल्याची खात्री करावी.

३) ओहोळ, नाला, नकाशावर मार्क करुन त्या भूमापन क्रमांकाचे भूस्वरुपानुसार वेगवेगळे भाग करावेत, व त्या भागांना अ, ब, क, ड ...... असे क्रमांक देण्यांत यावेत.

४) खोल सलग समपातळी चराची आखणी समपातळीतच होणे आवश्यक आहे.

**खोल सलग समपातळी चर खोदणे :-**

१) निवडलेल्या क्षेत्रामध्यें खोल स.स.चराची आखणी करुन प्रति हेक्टरी २४० मी. लांबीचे १ मी. रुंद व १ मी. खोल आकाराचे चर खोदण्यांत यावेत.

२) दोन चरातील उभे अंतर ३३ मी. व प्रत्येक २० मी. लांबीचे चर खोदल्यानंतर जादा पाणी काढून देण्यासाठी दोन मी. चे अंतर (गॅप) सोडून दुसरा २० मी. लांबीचा चर काढावा. दोन चरातील अंतर (गॅप) ठेवताना सदर गॅप स्टॅगर्ड पध्दतीने येतील असे नियोजन करावे. याकरिता निवडलेल्या गटातील चराची दुसरी ओळ खोदताना त्यातील सुरुवातीच्या चराची लांबी २० मी. ऐवजी १० मी. लांबीचे खोदून २ मी. अंतर (गॅप) सोडून त्याच समपातळीत २० मी. लांबीचा दुसरा चर खोदावा. अशा त-हेने गटातील सर्व चर स्टॅगर्ड पध्दतीने खोदावेत.

३) चर खोदताना चरातून निघालेली माती उताराच्या (चराच्या खालील) बाजूस ३० सें.मी. बर्म सोडून व्यवस्थितरित्या रचून त्याचा १ मी. उंचीचा बांध घालण्यात यावा.

४) चराच्या आखणीमध्यें झाडे झुडपे असल्यास ती तोडू नयेत किंवा मशिनरीने मोडू नयेत. याकरिता तेवढया भागामध्यें चर खोदण्यांत येवू नये.

५) खोल सलग समतल चराच्या भरावावर १ मी. अंतरावर शिसम, शिसू, खैर, करंद, कडुलिंब, हिरडा, बेहडा, सुबाभूळ अशा प्रजातींच्या हेक्टरी ४.८० किलो वृक्षांच्या बियाण्यांची किंवा सिताफळ, बोर, चिंच, विलायती

चिंच, कवठ, जांभूळ, करवंद, शेवगा, काजू इ. कोरडवाहू फळझाडांच्या बियाण्यांची पेरणी करावी किंवा शेतक-यांच्या आवडी व इच्छेप्रमाणे बियाणाची लागवड करावी.

६) चराच्या भरावावर पूर्ण लांबीला हॅमाटा, पवना, मारवेल, डोंगरी गवत, मद्रास अंजन, शेडा, निलगवत अशा प्रजातीच्या हेक्टरी ४.८० किलो गवताच्या बियाणांची पेरणी करावी.

**अंदाजपत्रक तयार करणे : -**

समपातळीदर्शक नकाशा तयार केल्यानंतर तांत्रिक तपशिलानुसार मंजूर दरपत्रकाप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत यावे. अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकिय मान्यता घेवूनच काम सुरु करावे. नमुना अंदाजपत्रक व संकल्प चित्र सोबत जोडण्यांत आलेले आहे.

**कामाची तपासणी :-**

आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. मदसं./मृद-४/तपासणी/१२१४, दिनांक ११/०५/२०१२ नुसार मृद संधारण कामांची तांत्रिक तपासणी करणेबाबत कळविण्यांत आले आहे. याशिवाय खोल सलग समपातळी चराच्या कामाची तांत्रिक तपासणी खालीलप्रमाणे करावी.

| अ.क्र | पदनाम | तपासणीचा तपशिल व प्रमाण. |
|---|---|---|
| १ | कृषि सहाय्यक | गटातील सर्व कामाची १०० टक्के तपासणी करणे. |
| २ | कृषि पर्यवेक्षक | गटातील सर्व कामाची १०० टक्के तपासणी करणे. |
| ३ | मंडळ कृषि अधिकारी | १. कार्यक्षेत्रातील झालेल्या प्रत्येक कामांची मापन पुस्तिकेत नोंद केलेल्या मोजमापांची प्रत्यक्ष क्षेत्रावर १५ टक्के तपासणी करणे व त्यापैकी किमान ५ टक्के तपासणी कृषि पर्यवेक्षकाने केलेल्या तपासणीपैकी असावी.<br>२. मापन पुस्तिका, हजेरी पत्रके, क्षेत्रिय पुस्तिका, वर्क रजिस्टर इ. ची नोंद ठेवणे व नियंत्रण करणे.<br>३. कृषि पर्यवेक्षक यांनी मोजणी केलेल्या गटापैकी कमीत कमी ३० टक्के गटाची पातळी तपासणी व प्रत्येक तपासणीमध्यें कमीत कमी १० छेदबिंदू तपासणी करणे.<br>४. रुपये ७५०००/- वरील माती कामांच्या देयकाच्या मापांची पगारपूर्व १०० टक्के तपासणी करणे. |
| ४ | तालुका कृषि अधिकारी | १. कार्यक्षेत्रात झालेल्या प्रत्येक कामांची मापन पुस्तिकेत नोंद केलेल्या मोजमापांची प्रत्यक्ष क्षेत्रावर १० टक्के रकमेचे मापन पुस्तिकेतील मोजमापांच्या नोंदीपैकी तपासणी करणे व त्यापैकी किमान ५ टक्के तपासणी ही कृषि पर्यवेक्षक/मंडल कृषि अधिकारी यांनी केलेल्या तपासणीपैकी असावी. |
| ५ | उप विभागीय कृषि अधिकारी | प्रत्येक तालुक्यात दरमहा कामावरील खर्चाच्या ३ टक्के मोजमापे व ५ टक्के पातळी, ५ छेदबिंदू तपासणी करणे, सदर तपासणी सर्व मंडळ व जास्तीत |

| | | |
|---|---|---|
| | | जास्त कृषि सहाय्यकाकडील असेल अशा रितीने करावी. |
| ६ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | प्रत्येक तालुक्यात दरमहा कामावरील खर्चाच्या २ टक्के तपासणी करणे, सदरची तपासणी शक्यतो तालुका कृषि अधिकारी/मंडळ कृषि अधिकारी/ कृषि पर्यवेक्षक/ तालुका स्तरावरील अधिकारी यांनी तपासणी केलेल्या कामापैकी असू नयेत. मात्र त्यांच्या अधिनस्त असणा-या अधिका-यांनी तपासणी केलेल्या कामाची पुनर्रतपासणी करण्याचे अधिकार त्यांना राहतील. |

**देखभाल :-**

खोल सलग समपातळी चराचे काम पूर्ण झाल्यानंतर ते संबंधित लाभार्थ्यांकडे हस्तांतरित करावे. पूर्ण झालेल्या कामांची देखभाल करण्याची जबाबदारी लाभार्थीची असल्याबाबत त्यांना लेखी सूचित करावे.

वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन खोल सलग समपातळी चराची कामे करण्यांत यावी.

सोबत :- नमुना अंदाजपत्रक व संकल्पचित्र

**संचालक**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन**
**कृषि आयुक्तालय, म.रा, पुणे-१,**

-------

जा.क्र.मृदसं/मृद-६/डिप सी.सी.टी./७१२/१५,
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
कृषि आयुक्तालय, म.रा.पुणे-४११ ००१
दिनांक- ३१/०३/२०१५.

**प्रति,**

१. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
३. प्राचार्य, प्रादेशिक कृषि व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था (रामेती) (सर्व)

**प्रतिलिपी:** सहमुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, म.रा. पुणे-१ यांना माहितीसाठी.

**यंत्राच्या सहाय्याने खोल सलग समपातळी चर (१ मी. X १ मी.) खोदण्यासाठी अंदाजपत्रक**

**प्रति हेक्टरी २४० र.मी. लांबी, दोन चरातील अंतर ३३ मी. (प्रति मनुष्य दिवस दर रु. १६२/-)**

| अ.क्र | कामाचा प्रकार | मनुष्य दिवस | मजुरी रक्कम(रु) | साहित्य रक्कम (रु) | एकूण रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कामाच्या क्षेत्राचे भूमापन करणे व उपचार नकाशा तयार करणे | ०.५ | ८१ | १० | **९१** |
| २ | आखणी करणे ०.२५ मनुष्य दिवस प्रति १०० रनिंग मीटर | ०.७५ | १२१.५० | ४० | **१६१.५०** |
| ३ | खोल सलग समपातळी चराचे खोदकाम करणे (१ मी. X १ मी X १ मी), लांबी २४० र.मी., २ चरातील अंतर ३३ मी., (२० मी. र.मी.नंतर २ मी. गॅप) यंत्राच्या सहाय्याने २४० घ.मी. खोदकामासाठी जलसंपदा विभागाचा डी.एस.आर.चे दर (चरातील भुस्तर (१) माती व मऊ मुरुम -२० टक्के, (२) कठीण मुरुम - ४० टक्के, (३) दगड धोंड्यासह कठीण मुरुम - ४० टक्के गृहित धरुन) रु. ४०.०१ प्रति घमी प्रमाणे | -- | ० | ९६०२.४ | **९६०२.४०** |
| ४ | खोल सलगसमपातळी चराचे भरावावर १ मी. अंतरावर वृक्ष, बियाणांची पेरणी करणे.(शिसम, शिसू, खैर, करंद, कडूलिंब इ. ४.८० किलोसाठी, रु.६० प्रति किलोप्रमाणे | २ | ३२४ | २८८ | **६१२** |
| ५ | खोल सलगसमपातळी चराचे भरावावर गवत बियाणे पेरणी करणे.(हॅमाटा, पवना, मारवेल इ. ४.८० किलोसाठी, रु.६० प्रति किलोप्रमाणे | २ | ३२४ | २८८ | **६१२** |
| | **एकूण खर्च** | | ८५०.५ | १०२२८ | **११०७९** |
| | आकस्मिक खर्च | | | | **३३२** |
| | **प्रति हेक्टर प्रस्तावित मापदंड** | | | | **११४११** |

# १ मी. X १ मी. आकारमानाचे खोल सलग समपातळी चराचे संकल्पचित्र




१) चराचा आकार - १.०० मी. x १.०० मी.
२) चराचा छेद - १.०० चौमी.
३) प्रति हेक्टर चराची लांबी - २४० मी.
४) दोन चरातील अंतर - 33.00 मी.

संचालक,
मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

कक्ष अधिकारी
महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.